महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग,नाशिक
दुसरा मजला, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक-४२२००१
दुरध्वनी क्रमांक - (०२५३) २९७१५७४; E-Mail ID :- jd-nashik@mah.gov.in

क्रमांक आस्था-२०२५/प्र.८(२)/क.ले./भरती प्रक्रीया /२०२५/0459/1289 दिनांक:- 27 MAY 2025

प्रति,

मा.सहसंचालक (संगणक/सुधारणा)
संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- कनिष्ठ लेखापाल भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने दिनांक २३.०५.२०२५ रोजी दोन शिफ्टमध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेच्या उत्तर तालिकेची लिंक संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेबाबत...

महोदया,

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक या विभागाची कनिष्ठ लेखापाल या पदाची परीक्षा दिनांक २३.०५.२०२५ रोजी तीन शिफ्टमध्ये ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आलेली असून टिसीएसद्वारे उत्तरतालिकेची लिंक या कार्यालयास पुरविण्यात आलेली आहे. तरी सदर लिंक व त्याअनुषंगाने आक्षेप नोंदविण्यास्तव सूचनापत्रक संचालनालयाच्या http://mahakosh.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर दि.२७.०५.२०२५ रोजी प्रसिद्ध करावी.

सदर लिंक ही दि.२७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासुन ते दि.३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० पर्यंत कार्यान्वीत राहील, ही विनंती.

सोबत - सूचनापत्रक

(माधव धों.थैल)
सहसंचालक (प्र.) ,
लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक

सूचनापत्रक

जाहिरात क्र.०१/२०२४, दि.२३.०१.२०२५ चे अनुषंगाने
उत्तर तालिका (Answer Key) व हरकत अर्जाबाबत सूचना.

सहसंचालक लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक च्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी वर्तमानपत्रात क्र.०१/२०२४, दिनांक २३.०१.२०२५ अन्वये प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या अर्हताधारक उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा दि.२३.०५.२०२५ रोजी तीन शिफ्टमध्ये घेण्यात आलेली आहे.

कनिष्ठ लेखापाल या पदांच्या उत्तर तालिकेची लिंक (Answer Key Link) http://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Carrears या मेन्युमध्ये दिनांक २७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासुन ते दिनांक ३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उमेदवारांनी वरीलप्रमाणे लिंकवर अर्ज क्रमांक (Application No.) व ऑनलाईन अर्ज भरतेवेळी वापरलेला पासवर्ड (Password) वापरुन उत्तरतालिका (Answer Key) तपासून घ्यावी तसेच Objection Form Live करण्यात येत आहे.

कनिष्ठ लेखापाल या पदांच्या ऑनलाईन परीक्षेचे प्रश्न अथवा उत्तराबाबत उमेदवारांच्या हरकती / आक्षेप असल्यास दिनांक २७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासून ते दि. ३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह उत्तरतालिकेसोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रहकत अर्जात पाठविण्यात याव्यात. प्रत्येकी एका हरकत/ आक्षेपाकरीता रु.१०० शुल्क आकारण्यात येत आहेत. सदरचे शुल्क उमेदवाराने UPI / INTERNET BANKING / CREDIT CARD / DEBIT CARD याद्वारे भरावे. विहित मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती / आक्षेप यांची दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(माधव धों.थैल)
सहसंचालक (प्र.) ,
लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक